आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
४ जून २०२५ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- गेल्या अकरा वर्षात देशातल्या ऊर्जा क्षेत्रात संरचनात्मक परिवर्तन झालं असून सर्वांना स्वच्छ आणि परवडण्याजोगी ऊर्जा मिळावी यासाठी सरकार आग्रही असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- दहशतवादाविरुद्ध भारताचं धोरण स्पष्ट करण्यासाठी विविध देशांना भेट देण्यासाठी गेलेल्या ४ बहुपक्षीय शिष्टमंडळांचा दौरा पूर्ण

- प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत महाराष्ट्रात ८० हजार कोटींची गुंतवणूक होणार असून प्रत्येकाला घर देणारं महाराष्ट्र हे देशातलं पहिलं राज्य ठरेल असा मुख्यमंत्र्यांना विश्वास

- मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर गेल्या दोन दिवसात ८ कोटी साठ लाख किमतीचा गांजा जप्त

**आणि**

- देशाच्या ईशान्य भागात पावसाचा जोर, पूरस्थितीमुळे जनजीवन प्रभावित

**<><><><><>**

मागच्या अकरा वर्षात देशातल्या ऊर्जा क्षेत्रात संरचनात्मक परिवर्तन झालं असून जनतेला स्वच्छ आणि परवडण्याजोगी ऊर्जा मिळावी यासाठी सरकार आग्रही आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. सुधारणा, हरित ऊर्जा उपक्रम आणि स्वावलंबन यासाठी सरकारचा विशेष आग्रह असल्याचं प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमावरल्या पोस्टद्वारे सांगितलं. यासाठी त्यांनी पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंग पुरी यांच्या एका लेखाचा दाखला दिला.

भारत जगातली सर्वात वेगानं वाढणारी अर्थव्यवस्था बनला आहे, तसंच एक धोरणात्मक शक्ति म्हणूनही उदयाला येत आहे, असं पुरी यांच्या या लेखात म्हटलं

आहे. ऊर्जा क्षेत्र  देशाच्या विकासासाठी महत्त्वाचं असून गेल्या दहा वर्षात केलेल्या कामाच्या पायावर या क्षेत्रात संरचनात्मक परिवर्तन झालं आहे, असं पुरी म्हणाले. प्रधानमंत्र्यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखील देशाचं ऊर्जा क्षेत्र आत्मनिर्भर झाल्याचंही पुरी यांनी या लेखात म्हटलं आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली आज नवी दिल्ली इथं केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक होणार आहे. ऑपरेशन सिंदूर नंतरची ही पहिलीच मंत्रिमंडळ बैठक आहे.

<><><><><>

जागतिक स्तरावर आपत्ती व्यवस्थापनाच्या प्रयत्नांमध्ये सहभागी होण्याची क्षमता विकसित करण्यासाठी  वचनबद्ध असल्याची ग्वाही भारताने दिली आहे. प्रधानमंत्र्यांचे मुख्य सचिव पी के मिश्रा यांनी जिनिवा इथं ‘आपत्ती जोखीम कमी करणे’ या विषयावरच्या आठव्या परिषदेत ही भूमिका मांडली. मिश्रा यांनी नॉर्वेच्या आंतरराष्ट्रीय विकास उपमंत्र्यांशी चर्चा केली आणि आपत्तीकाळातील जोखीमभार कमी करण्याच्या कामी आंतरराष्ट्रीय सहकार्याचं महत्व अधोरेखीत केलं अशी माहिती प्रधानमंत्री कार्यालयाने दिली आहे.  या कार्यक्रमाच्या उद्घाटन सत्रालाही मिश्रा उपस्थित राहिले. लवचिक आणि सुरक्षित भविष्यासाठी  भागीदारी दृढ करणे असा भारताचा दृष्टीकोन  असल्याचं  त्यानी यावेळी स्पष्ट केलं.

<><><><><>

दहशतवादाविरुद्ध भारताच्या शून्य सहिष्णुतेचं धोरण स्पष्ट करण्यासाठी जगभरातल्या विविध देशांना भेट देण्यासाठी गेलेल्या सात बहुपक्षीय शिष्टमंडळांपैकी ४ शिष्टमंडळं भारतात परतली आहेत. या दौऱ्यात शिष्टमंडळांनी विविध परदेशी नेते, वरिष्ठ अधिकारी, प्रभावशाली विचारवंत, माध्यमं आणि भारतीय समुदायांशी संवाद साधला. शिवसेना खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखालचं शिष्टमंडळ आज

सकाळी यूएई, लायबेरिया, काँगो आणि सिएरा लिओनला भेट देऊन भारतात परतलं. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखालचं शिष्टमंडळ आज दुपारी देशात परतणार आहे. या शिष्टमंडळाने कतार, दक्षिण आफ्रिका, इथिओपिया आणि इजिप्तला भेट दिली. भाजपा खासदार रविशंकर प्रसाद यांच्या नेतृत्वाखालचं शिष्टमंडळ सध्या बेल्जियममध्ये युरोपियन यूनियनच्या मुख्यालयाला भेट देत आहे. काँग्रेस खासदार शशी थरूर यांच्या नेतृत्वाखालचं शिष्टमंडळ वॉशिंग्टन डीसीला पोहोचलं. तिथे त्यांनी अमेरिकन काँग्रेसचे सदस्य आणि प्रशासन तसंच माध्यम प्रतिनिधींना भेटून त्यांना ऑपरेशन सिंदूर आणि दहशतवादाविरुद्ध भारताच्या भूमिकेबद्दल माहिती दिली.

**<><><><><>**

हज यात्रेसाठी भारतासह जगभरातून सुमारे १८ लाख यात्रेकरु सौदी अरेबियात मीना इथं जाणार आहेत. या यात्रेकरुंनी मक्का इथून मीना इथं जाण्यासाठी प्रवास सुरु केला आहे. भारतीय हज यात्रेकरूंचा प्रवास आरामदायी होण्यासाठी प्रयत्न करत असल्याचं अल्पसंख्याक व्यवहार मंत्रालयानं समाज माध्यमावर केलेल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे. भारतीय यात्रेकरू माहिती घेण्यासाठी आणि तक्रार नोंदवण्यासाठी हज सुविधा मोबाइल ॲपचा वापर करु शकतात.

**<><><><><>**

प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत महाराष्ट्रात ८० हजार कोटींची गुंतवणूक होणार असून प्रत्येकाला घर देणांर महाराष्ट्र हे देशातलं पहिलं राज्य असेल असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. ते काल पुणे इथं प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) लाभार्थी मेळावा आणि महाआवास अभियान राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्यात बोलत होते. शिवराजसिंह चौहान आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या पुरस्कारांचं वितरण झालं. प्रधानमंत्री आवास योजनेच्या पहिल्या टप्प्याची घरं पूर्ण करत असताना केंद्राने २० लाख

घरकुलांना मंजुरी दिली होती. त्यापैकी १० लाख घरांचा पहिला हप्ता ग्रामविकास विभागाने जमा केला आहे. त्यामुळे एकही लाभार्थी घरापासून वंचित राहणार नाही, असं आश्वासन मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिलं.

<><><><>

मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर गेल्या दोन दिवसात सीमाशुल्क विभागाने ८ कोटी साठ लाख किमतीचा गांजा जप्त केला. बँकॉकहून दोन वेगवेगळ्या विमानातून आलेल्या प्रवाशांचा संशय आल्याने त्यांची कसून तपासणी केली असता त्यांनी सामानातून सुमारे साडेआठ  किलो गांजा लपवून आणल्याचं उघडकीस आलं. या प्रकरणी तीन भारतीय नागरिकांना अंमली पदार्थ प्रतिबंधक कायद्याखाली अटक केली आहे.

<><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघानं विजेतेपद पटकावलं आहे. काल अहमदाबाद इथं झालेल्या चुरशीच्या लढतीत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघानं किंग्ज इलेव्हन पंजाबचा सहा धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना रॉयल चॅलेंजर्सनं १९० धावा केल्या तर प्रत्युत्तरादाखल किंग्ज इलेव्हन पंजाबला १८४ धावाच करता आल्या. आरसीबीचा कृणाल पांड्या सामनावीर ठरला. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाला १७ वर्षांनी आयपीएलचं विजेतेपद मिळालं असून विजेत्या संघाचं बंगळुरूमधे जल्लोषात स्वागत झालं.

<><><><>

नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेत भारताच्या अर्जुन एरिगसी याने आठव्या फेरीत अमेरिकेच्या फॅबियानो कारुआना याचा पराभव केला. तर महिलांच्या गटात भारताच्या वैशाली रमेशबाबू हिने चीनच्या जू वेनजुन हिला पराभूत केलं. दरम्यान, विश्वविजेता डी. गुकेश याला आठव्या फेरीत अमेरिकेच्या हिकारू नाकामुरा

याच्याकडून पराभव पत्करावा लागला. जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर असलेल्या मॅग्नस कार्लसन याला चीनच्या वेई यी याने पराभूत केलं.

**<><><><><>**

देशाच्या ईशान्य भागात पावसाचा जोर आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी काल मणिपूरचे राज्यपाल अजय कुमार भल्ला यांच्याशी संवाद साधून पूर परिस्थितीचा आढावा घेतला. आणि केंद्राकडून सर्वतोपरी मदत करण्याचं आश्वासन त्यांनी दिलं. मणिपूरमध्ये इम्फाळ पूर्व जिल्ह्यातली ६४३ गावं पुरामुळं बाधित झाली असून, एक लाख ६४ हजार ८०० हून अधिक लोक विस्थापित झाले आहेत. एकाचा मृत्यू झाला. तर चार जण जखमी झाले आहेत. पुरात ३५ हजारहून अधिक घरांचं नुकसान झालं आहे.राष्ट्रीय आणि राज्य आपत्ती निवारण दल, पोलिस, निमलष्करी दल, रेडक्रॉस, अग्निशमन दलांकडून पूरग्रस्त भागात बचावकार्य सुरू आहे. दरम्यान, मणिपूरमध्ये आज पावसाचा जोर कमी झाला असून  बहुतांश नद्यांचं पाणी उतरलं आहे. आसाममध्ये पूरस्थिती अद्यापही गंभीर असून २१ जिल्ह्यांमधल्या ६ लाख ३० हजारांहून अधिक जणांना पुराचा फटका बसला आहे. पुरामुळे घडलेल्या विविध घटनांमध्ये आतापर्यंत १२ जणांचा मृत्यू झाला आहे. राज्यातल्या दीड हजारांहून जास्त गावांमध्ये पुराचं पाणी शिरलं असून १४ हजार ७०० हेक्टरपेक्षा जास्त जमिनीवरच्या पिकांचं नुकसान झालं आहे. SDRF आणि NDRFची पथकं बचावकार्य करत आहेत. ब्रह्मपुत्रा, बराक आणि इतर उपनद्या धोक्याच्या पातळीच्या वर वाहत आहेत. राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिलेल्या माहितीनुसार, २२३ मदत छावण्या उभारण्यात आल्या असून त्यात सध्या ४० हजारांहून जास्त जणांनी आश्रय घेतला आहे.

सिक्कीममध्ये लाचेन आणि चाटेन इथं अनेक ठिकाणी भूस्खलन झाल्यामुळं रस्ते संपर्क तुटल्यानं, अडकून पडलेल्या १५० पर्यटकांपैकी ३४ जणांची काल

सुटका करण्यात आली. उर्वरित पर्यटकांच्या सुटकेसाठी वायु दल आणि आपत्ती निवारण दलानं आज सकाळपासून पुन्हा प्रयत्न सुरू केले आहेत. चाटेन इथं १३० पर्यटक असून ते त्यांच्या हॉटेलमध्ये सुरक्षित आहेत. एनडीआरएफच्या सॅटेलाईट फोनद्वारे त्यांच्याशी संपर्क साधण्यात येत आहे, अशी माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी दिली. यात महाराष्ट्रातल्या काही पर्यटकांचा समावेश असून त्यांच्या सुटकेसाठी राज्य सरकारनं स्थानिक प्रशासनाशी संपर्क साधला आहे. दरम्यान, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी काल सिक्कीमचे मुख्यमंत्री प्रेमसिंह तमांग यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधून मदतकार्याचा आढावा घेतला.

//<><><><><>//